# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक २१ मार्च, २०१३.

**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.**

**तीन : म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचना - (असल्यास).**

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - (असल्यास).**

**पाच : लक्षवेधी सूचना- (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

**(बुधवार, दिनांक २० मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) - (क्रमांक १ ते ४)**

(१) **डॉ. दिपक सावंत वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" मुंबईतील बॉम्बे (मुंबई) नर्सिंग होम्स ॲक्ट खाली नोंदणीकृत झालेली अनेक नर्सिंग होम्स (फायर एन.ओ.सी.) अग्निशमन दलाच्या ना हरकत प्रमाणपत्राच्या प्रतिक्षेत असल्याने त्यांचे मुंबई शहर व उपनगरातील लायसेन्स (परवाना) नुतनीकरण होत नाही, नर्सिंग होम्स परवाना पुनर्जीवित न झाल्याने मेडिकल इन्शुरन्सचा फायदा सामान्य रुग्णांना मिळत नसणे, त्यामुळे सर्वसामान्यांना भूर्दंड पडत असणे, मुंबईत काही नर्सिंग होम्स डे-केअर सेंटर्स असून, काही सन १९९५ च्या पूर्वीची नर्सिंग होम्स असणे, त्यामुळे नर्सिंग होम्ससाठी आवश्यक वेगळा प्रवेशही उपलब्ध नसणे, त्यामुळे डॉक्टर्स, नर्सिंग होम्स चालक व मेडिकल इन्शुरन्स मिळणारे रुग्ण यांच्यात प्रचंड असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भुमिका. "

(२) **सर्वश्री. अमरसिंह पंडित,** सतीश चव्हाण, धनंजय मुंडे **वि.प.स**. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" बीड जिल्ह्यात विशेषत: गेवराई तालुक्याच्या गोदाकाठ परिसरात रानडुक्कर व हरिणासारख्या प्राण्यांनी घातलेला हैदोस, दुष्काळ व पाणी टंचाई यामुळे अतिशय

काटकसरीने जोपासलेली ऊस, कापूस आदींसारखी नगदी पिके रानडुक्करांच्या प्रादुर्भावामुळे नष्ट होणे, यामुळे शेतकऱ्यांचे झालेले कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान हवालदिल

झालेला शेतकरी, शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे वन व महसूल विभागाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, नुकसान भरपाईसाठी शासनाने केलेली जाचक प्रणाली, संरक्षित प्रजातीमुळे रानडुक्कर व हरिणांचा बिमोड करण्यास शासकीय स्तरावरुन येत असलेल्या अडचणी, यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना व प्रतिक्रिया. "

(३) **डॉ. रणजित पाटील,** सर्वश्री. नागो गाणार, दिपकराव साळुंखे, संदिप बाजोरिया, हेमंत टकले, जयवंतराव जाधव, विक्रम काळे, अनिल भोसले, सतीश चव्हाण **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" राज्यातील १ हजार ३९ गोदामांपैकी १८४ गोदामे निकृष्ट दर्जाची आढळून येणे, ७५ लाख मेट्रीक टन धान्याच्या साठवणुकीचा प्रश्न राज्याच्या अन्न पुरवठा विभागासमोर निर्माण होणे, लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या धान्याच्या साठवणीबाबत राज्य शासन फारसे गंभीर नसणे, परिणामी साठवलेले धान्य दरवर्षी खाण्याच्या स्थितित राहत नसल्याचे आर्थिक पाहणी अहवालात स्पष्ट होणे, कुजलेल्या अवस्थेमधील हे धान्य शिधापत्रिकाधारकांना वितरीत केले जाणे, त्याच बरोबर राज्यात ५ कोटी ६८ लाख मेट्रीक टन धान्य साठवण्यासाठी पुरेशी गोदामेच नसल्याने भाड्यापोटी वर्षाकाठी २८० कोटी ६८ लाख रुपयाचा महसुल खर्च व्यर्थ जाणे, तसेच पावसाळ्यात गोदामाच्या गळतीमुळे धान्याची नासाडी होणे, प्रतिकुल परिस्थितीत टिकून राहण्यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च केले जात असणे, निकृष्ट गोदामाचा यादीमध्ये राज्यातील २१ जिल्हे असून विदर्भातील गोदाम संख्या सर्वाधिक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

(४) **दिप्ती चवधरी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" पुणे येथील खडकवासला कालव्याची कोट्यवधी रुपये किंमतीची जागा खासगी

विकासकाला देऊन या महसुलामधून ७०० कोटी रुपये किंमतीचा खडकवासला ते फुरसुंगी दरम्यानचा भुयारी कालवा बांधण्याच्या कामास राज्य शासनाने मंजुरी दिल्यानंतरही अद्याप प्रत्यक्षात कामात अजिबात सुरुवात न होणे, त्यामुळे दरवर्षी ५ टीएमसी पाणी वाया जाणे, खडकवासला ते फुरसुंगी दरम्यानच्या २४ किलोमीटरच्या पट्ट्यात हा भुयारी कालवा काढण्याचा प्रस्ताव असणे, पुणे शहराला वाढत्या मागणीनुसार पाणीपुरवठा करु शकेल असे धरण बांधण्यासाठीची जागा उपलब्ध नसल्याने पाण्याची गळती, चोरी आणि बाष्पीभवन रोखण्यासाठी भुयारी कालवा हा उत्तम पर्याय ठरेल असे या प्रस्तावात नमूद असणे, खडकवासला धरणाच्या मुखाशी हा भुयारी कालवा सुरु होऊन धायरी, कात्रजमार्गे डोंगरातून फुरसुंगीपर्यंत नेण्याच्या या प्रस्तावित कालव्यासाठी जमीन संपादन व सर्वेक्षण होऊन शासनाने संबंधित प्रस्तावाला मान्यता देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. "

(५) **सर्वश्री. विनोद तावडे,** चंद्रकांत पाटील, ॲड. आशिष शेलार, श्री. रामनाथ मोते **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" राज्यात क्षमतेपेक्षा जास्त माल भरुन वाहतूक करणाऱ्या ट्रक तसेच कन्टेनरचे प्रमाण दिवसेंदिवस वाढणे, सर्वोच्च न्यायालयाने २००५ साली सर्व रस्त्यांवर अशा प्रकरच्या वाहतूकीवर बंदी घालण्याचे दिलेले आदेश CRISIL या संस्थेने केलेल्या अभ्यासान्वये क्षमतेपेक्षा १० टक्के जास्त माल वाहतूक केल्याने महामार्गाचे आयुष्य ३५ टक्क्यांनी घटणे, वाहनांच्या मागील बाजूस टेल लॅम्प व पुढचे हेड लाईट चांगल्या व सुस्थितीत नसणे, वेग मर्यादा न पाळणे, वाहनांच्या मागील बाजूस बंपरला किंवा डिक्कीला रेट्रो रिफ्लेक्टीव्ह लाल रंगाची टेप न लावणे, घाई-घाईने किंवा निष्काळजीपणे ओव्हरटेक करणे, नियमाप्रमाणे गाडीचे आयुष्य संपले असताना देखील त्याचा धोकादायकरित्या माल वाहतूकीसाठी वापर करण्यात येणे, इत्यादी आरटीओने घालून दिलेल्या अनेक नियमांचे सर्रासपणे उल्लंघन होणे, परिणामी अपघातांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होणे, नागरिकांमध्ये विशेषत: अपघातग्रस्तांमध्ये शासनाविषयी तीव्र संताप व असंतोष पसरणे, अवैध वाहतूकदारांशी संगनमत करुन नियमानुसार कारवाई न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तसेच अवैध वाहतूकदारांवर कडक कारवाई करण्याची नागरीकांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. "

(६) **सर्वश्री. चरणसिंग सप्रा,** संजय दत्त **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" मुंबईतील मुलुंड येथील वनविभागालगत असलेल्या राहुलनगर, शंकरटेकडी, गणेशपाडा, पंचशिलनगर, हनुमानपाडा या ठिकाणी ५० ते ६० वर्षापासून असलेल्या झोपडपट्टी वसाहतीच्या हद्दीबाबत दुमत असल्याकारणाने संपूर्ण विभागाची वन व महसुल विभागाद्वारे नगर भूमापन अधिकारी, मुलुंड ता.कुर्ला, जिल्हा मुंबई उपनगर यांच्या अधिकार कक्षेत दिनांक १ ऑक्टोबर, २०१२ रोजी झालेल्या संयुक्त तपासणीचा तपशिलवार निर्णय अद्यापपर्यंत उपलब्ध झालेला नसणे, स्थानिक लोकनेत्यांच्या पाठपुराव्यामुळे सन २०१० मध्ये हुनमानपाडा येथील ३ एकर २८ गुंठे जमिनीचा ताबा महसुल विभागाकडे देण्यात आलेला असणे, मात्र, त्यांच्या पुनर्वसनासाठी शासकीय यंत्रणेकडून मुलुंडपासून दुर इतर ठिकाणी करण्याचे नियोजित असणे, या रहिवाशांची उदरनिर्वाहाची साधने तसेच पाल्यांच्या शाळा/महाविद्यालये याच परिसरात असल्याने याला पर्याय म्हणून मुलुंडमधील वनमुक्त घोषित झालेल्या तसेच इतर पब्लीक हौसिंगसाठी आरक्षित असलेल्या भूखंडांवर सदर रहिवाशांचे पुनर्वसन करण्याची नितांत आवश्यकता, त्याचप्रमाणे शासनाने मुलुंड कॉलनी येथे सिंधी, पंजाबी लोकांच्या वस्तीसाठी सनद दिलेली असतांना देखील वन विभाग या भागात हक्काचा दावा करत असल्यामुळे येथील रहिवाशांमध्ये पसरलेली असंतोषाची भावना, या बाबतीत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **ॲड. जयदेव गायकवाड,** सर्वश्री. जयवंतराव जाधव, विक्रम काळे, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. किरण पावसकर, अनिल भोसले, राणा जगजितसिंह पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ. अपुर्व हिरे, सर्वश्री. दिपकराव साळुंखे, संदिप बाजोरिया **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थी, कर्मचारी, अधिकारी इत्यादींना जातवैधता प्रमाणपत्र (कास्ट व्हॅलिडिटी सर्टिफिकेट) सक्तीचे असणे, या प्रमाणपत्राशिवाय मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदोन्नती न मिळणे किंवा त्यांच्या नोकरीवर गदा येणे, विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश न मिळणे, या कामासाठी शासनाने राज्यात १५ समित्यांवर चेअरमन नियुक्त करुनही त्यांपैकी १२ जागा रिक्त असणे, मार्च महिन्यात शाळा महाविद्यालयाचे प्रवेश सुरु होत असणे, आधीच १२ लाख प्रमाणपत्रे प्रलंबित असणे, त्यात आणखी भर

पडण्याची शक्यता, त्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यात व अधिकारी/कर्मचाऱ्यांत पसरलेले चिंतेचे वातावरण, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**सहा : विशेष उल्लेख (असल्यास)- (म.वि.प. नियम १०१-अ अन्वये).**

## मध्यंतर

**सात : म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

**सर्वश्री. विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ. दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री. रामनाथ मोते, सुमंतराव गायकवाड, ॲड. आशिष शेलार, ॲड. अनिल परब, डॉ.रणजीत पाटील, सर्वश्री. नागो गाणार, भगवान साळुंखे वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"महाराष्ट्रामध्ये मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर इत्यादी शहरात सोनसाखळी चोऱ्या, अपहरण, चोऱ्या, खून, दंगली, इत्यादींच्या प्रमाणात झालेली लक्षणीय वाढ, मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा मास्टर माईंड हाफिज सईद याचे चिथावणीखोर व धार्मिक भावना भडकाविणाऱ्या भाषणाचे ध्वनिमुद्रण आणि दृकश्राव्य फितीचा मोबाईलद्वारे धुळे येथे मोठ्या प्रमाणात प्रसार करण्यात आल्याने दिनांक ६ जानेवारी, २०१३ रोजी धुळे येथील मछली बाजार येथे दंगल उसळणे, या दंगलीत दंगेखोरांकडे तीक्ष्ण धारधार शस्त्रास्त्रे व विशिष्ट प्रकारचे ॲसिड सापडणे, आंध्र प्रदेश राज्यातील एम.आय.एम. या पक्षाचे लोकप्रतिनिधी अकबरुद्दीन ओवेसी यांनी नांदेड येथे केलेल्या प्रक्षोभक भाषणाप्रकरणी संबंधीत पोलीस स्थानकामार्फत अद्यापी कोणतीही कारवाई केलेली नसणे, एकूण गुन्हेगारीत वाढ झालेली असताना पोलीसांच्या व विधी व न्याय खात्याच्या संशयास्पद भूमिकेमुळे गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण गतवर्षी केवळ ९ टक्के असताना या वर्षी ते ९ टक्क्याच्याही खाली आलेले असणे, शिक्षा झालेले अनेक आरोपी पॅरोलच्या नियमांचे उल्लंघन करून फरार होवून गंभीर गुन्हे करीत असल्याचे निदर्शनास येणे, दिल्ली येथील निर्भया प्रकरण ताजे असताना मुंबईत भर अधिवेशन कालावधीत म्हणजेच दिनांक १५ मार्च, २०१३ व दिनांक १६ मार्च, २०१३ अनुक्रमे विलेपार्ले आणि माटुंगा येथे सामुहिक बलात्काराच्या घडलेल्या गंभीर घटना, भंडारा जिल्ह्यात तीन अल्पवयीन मुलींवर बलात्कार करून त्यांचा खून करण्यात आल्याप्रकरणी गृह खात्याच्या व फॉरेन्सिक खात्याच्या तपासणी अहवालात नसलेली एकवाक्यता, राज्यात महिला, अल्पवयीन मुली, दलित व बालकांवरील अत्याचारात वाढ होवून यामध्ये पुरोगामी महाराष्ट्राने

मागास राज्यांनाही मागे टाकणे, नवी मुंबईतील सुनिल लाहोरिया खून प्रकरण, संध्या सिंग खून प्रकरण, सिडकोतील लिपिक श्री.अतुल म्हात्रे खून प्रकरणांसह अनेक गंभीर खून प्रकरणांचा तपास लावण्यास गृह खात्यास आलेले अपयश, डान्सबार बंद करण्याची घोषणा करुन देखील समाज शाखेच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने मुंबई महानगरक्षेत्रात डान्सबार सुरु असणे, सायबर गुन्ह्यांच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक करण्याच्या घटनेत देखील वाढ झालेली असणे, मुंबई शहरातील खाजगी आस्थापनांवर तैनात असलेल्या २१ खाजगी सुरक्षारक्षकांकडून दिनांक १० जानेवारी, २०१३ रोजी बेकायदेशीर शस्त्रास्त्रांचा जप्त केलेला साठा, २६/११ च्या हल्ल्यानंतर सीसीटिव्ही यंत्रणा बसविण्याची घोषणा करुन देखील अद्यापपर्यंत सीसीटिव्ही यंत्रणा बसविलेली नसणे, एकूणच राम प्रधान समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत शासनाची असलेली उदासिन भूमिका, यासर्व बाबींमुळे पोलीस दलाबाबत संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**आठ : शासकीय विधेयके :-**

**(अ) विधानसभेने संमत केल्यास - विधेयक विचारात घेणे -**

सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०१३.

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१३.

**नऊ : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी)**

**(१) श्री.सतिश चव्हाण व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात दिवसेंदिवस महागाई वाढत असूनही सेवायोजन कार्यालयात नोंदणी करणाऱ्या सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी प्राप्त न होणे, नोकरीची संधी प्राप्त होत नसल्याने गोवा शासनाने सुशिक्षित बेरोजगारांना रुपये १२००/- प्रतिमहिना देण्याचा निर्णय घेतला जाणे, तथापि प्रगत अशा महाराष्ट्र शासनाने गोवा शासनाच्या निर्णयाप्रमाणे सुशिक्षित बेरोजगारांना मदत देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री.संदिप बाजोरिया व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित**

**करतील.**

"मौजे मुरली तांडा (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील मारुती मंदिराजवळ गुप्त धनासाठी बालिकेचा बळी देण्यासाठी खड्डा खोदण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१३ मध्ये निदर्शनास येणे, अद्याप खेडोपाड्यात अंधश्रध्दा असून बालकांचा बळी देण्यात येत असणे, सदर घटनेत समाविष्ट असलेल्या संशयीतांना पकडून पोलीसांच्या स्वाधीन करण्यात येवूनही त्यांच्यावर कोणतीच कारवाई करण्यात न येणे, परिणामी नागरीकांत पसरलेले भितीचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २० मार्च, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.